मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
'त्रिभुवन टेरेस',
'एन्' ब्लॉक १ ला मजला
डॉ दादासाहेब भडकमकर मार्ग विभाग,
मुंबई – ४०० ००७

ग्रंथ मोजणी
१९७५-७६

ग्रंथ मोजणी
१९७६-७७

ग्रंथ मोजणी
१९८३-८४

९४९८०

ग्रंथ मोजणी
१९८४-८५

RAMANATH PANDIT CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH IN INDIAN HERITAGE
Date ..........
ESTD. 1981

# जाणता – अजाणता

म धु सू द न का ले ल क र

पुस्तक आठ दिवसांत
परत करावे.

मू ल्य आ ठ रु प ये

प्रमाणपत्राचा क्रमांक डी. आर. एम.– ५१/७५
दिल्याची तारीख– ११–१–७५

या नाटकाचे, पटकथेचे, भाषांतराचे,
पुनर्मुद्रणाचे, नभोवाणीचे, दूर चित्रवाणीचे,
तसेच नाट्यप्रयोगाचे सर्व हक्क
सौ. मीना कालेलकर यांच्याकडे आहेत.

© सौ. मीना कालेलकर,
C/२ ज्ञानदेवी, साहित्य सहवास–
वांद्रा (पूर्व) मुंबई ५१.


वि. सू.– आमच्या लेखी परवानगी घेतल्याशिवाय या नाटकाचे प्रयोग कुणालाही करता येणार नाहीत.

१९८०–८१

ग्रंथ - मोजणी
१९८१-८२

१९८५-८६

ग्रंथ-मोजणी
१९८२-८३



प्रिय राजाभाऊ–

या नाटकाची कथा मी तुम्हाला ऐकवली होती तुमच्या घरी! तुम्हाला ती आवडली. तुम्ही म्हणाला होता की, कथा चांगली आहे. लौकरात लौकर लिहून काढा. यातली डॉक्टरची भूमिका मी करणार आहे! पण दैवानं तुमच्या वाट्याला दिली ती भूमिका पेशंटची! तुमच्या सांगण्याप्रमाणे मी नाटक लौकरात लौकर लिहिलं– पण तुम्ही इतक्या लवकर निघून जाल असं वाटलं नव्हतं! पण तुम्ही गेलात! आणि आशीर्वादासाठी पायाभरणी एक जागा होती तीहि गेली–जाणता-अजाणता.

–मधुसूदन कालेलकर
१ मे १९८२

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
"त्रिभुवन टेरेस",
'पनू' ब्लॉक १ ला मजला
डॉ दादासाहेब भडकमकर मार्ग विभाग,
मुंबई – ४०० ००७.

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

(रंगभूमीवरील पडदा दूर होतो आणि दिसू लागतो विभाकरच्या घराचा दिवाणखाना. विभाकर एका चांगल्या कंपनीत सेल्स मॅनेजरच्या हुद्यावर आहे. घरात इन मीन चार माणसं! विभाकर-त्याची पत्नी वासंती-वासंतीची धाकटी बहिण मधुरा आणि विभाकरचा मुलगा अजय! नाही म्हणायला कधीमधी आपल्या मुलाच्या घरी येऊन रहाणाऱ्या माई. विभाकरची आई. आज अजयचा सहावा वाढदिवस म्हणुन माई मुद्दाम आलेल्या आहेत. दिवाणखाना व त्यातील फर्निचर साधंच आहे. उजव्या बाजूला कोपऱ्यात एका दिवाण. त्याच्या बाजूला एक टेलीफोन. डाव्या बाजूला सोफासेट व टी पॉय. त्याच्या मागल्या बाजूला स्वैपाकघर. प्रवेशद्दार उजव्या बाजूला असून त्याच्या डाव्या अंगाला बेडरूम आहे विभाकरची. त्याच्यासमोर दार आहे मधुरेच्या बेडरूमचे. प्रवेशद्दारालगत छोटीशी लायब्ररी असून त्यावर रेडिओ आहे. वेळ सकाळची. रंगभूमीवर काही क्षण कुणीही नाही तोच आतल्या बाजूने अजयच्या ओरडण्याचे आवाज ऐकू येतात- 'तू नको जा. मला मावशी पायजे' अशा अर्थाचे आणि काही क्षणात, अजय वय वर्षे सहा आतल्या खोलीतून बाहेर येतो. तो चिडलेला आहे. येताच तो अंगातील बुशशर्ट काढून फेकून देतो. तोच आतून माई त्याच्या पाठोपाठ येतात)

माई — (त्याला समजावीत) अजय असं काय वेड्यासारखं!

अजय — मी वेडाच आहे. मावशी कुठे आहे?

माई — अरे ती आंघोळ करतेय. (बुशशर्ट उचलीत) घाल पाहू बुशशर्ट. शाळेला उशीर होईल.

अजय — होऊ दे. (अंगातला बनिअन काढतो)

माई — शहाणी मुलं असं करतात का!

अजय — करतात.

माई आज तुझा वाढदिवस !

अजय असू दे जा. (मोठ्याने) मावशी. (आतून वासंती येते)

वासंती काय झालं रे अजू ?

माई तूच समजूत घाल सूनबाई तुझ्या मुलाची. आम्ही हात टेकले.

वासंती अजू, असं वागतात का ? आजी मुद्दाम आली तुझ्या वाढदिवसासाठी. तू असा वागलास तर जातील त्या.

अजय जाऊ दे.

वासंती बरं. मी घालते कपडे.

अजय नको ! मावशीऽ (पँट सोडतो. आत छोटी चड्डी आहे.)

माई बाई बाई बाई ! शर्थ झाली हो तुझ्या पोरापुढे.
(तोच आतून विभाकर येतो)

विभाकर काय रे हे !

वासंती बघा ना. घातलेले सगळे कपडे काढून टाकले.

विभाकर इथे ! चारचौघासमोर ! वासंती मला वाटतं यानं सखाराम बाईन्डर पाहिलं असणार ! त्याशिवाय असं करणार नाही तो.

वासंती काहीतरीच काय ! ते नाटक हा कसा पाहील ! फक्त प्रौढांसाठी आहे ते.

विभाकर प्रौढांसाठी ! मग तुला कसं पहाता आलं !

वासंती थट्टा पुरे ! आधी आपल्या लाडक्या लेकाला समजावा ! शाळेला उशीर होतोय.

विभाकर काय झालं असं रागवायला आमच्या अजूला. (जवळ जातो.)

अजय आजीने कपडे का घातले !

विभाकर आ ! हा हा माई का कपडे घातलेस तू याला ! तुला ठाऊक नाही त्याची मावशी त्याला कपडे घालते ! गेली कुठे याची मधुरा मावशी.

वासंती अहो ती स्नान करतेय !

विभाकर म्हणून काय झालं ! बरं जाऊ दे. आज मी कपडे घालतो आमच्या अजूला.

अजय नको ! मावशी (मोठ्याने) मावशी. (तोच आतून नुकतीच आंघोळ केलेली मधुरा येते)

मधुरा काय झालं आमच्या अजू बाळाला !

माई काही नाही. तूच हवीस त्याला कपडे घालायला ! आम्ही घातलेले कपडे टोचतात अंगाला.

मधुरा अजूबाळ, असा हट्ट करायचा का ? (कपडे घालू लागते) मग लोक वेडा म्हणतात.

माई आमची काय तक्रार. बस दे त्याला सगळ्यांच्या डोक्यावर.



विभाकर माई तू कशाला चिडतेस अजयसारखी ! अग मी आणि वासंती नावाचे आई-वडील राष्ट्रपतीसारखे ! सगळं काही करतात या इंदिराजी !

वासंती लहानपणापासून याला मधुरेचाच लळा ! कुणाला वाटेल मधुराच त्याची आई म्हणून. (मधुरा बहिणीकडे पहाते)

माई पण उद्या मधुरा लग्न करून गेली म्हणजे ?

अजय मावशी लग्न करणारच नाही मुळी !

माई तुझ्या आईनं नाही का केलं लग्न तुझ्या बाबांशी ! तसं मावशीही करील लग्न कुणाशी तरी !

अजय मीच लग्न करीन मावशीशी. (सगळे हसू लागतात. मधुरा त्याचा पापा घेते)

विभाकर सेन्सॉर-सेन्सॉर (मधुरा चमकून पहाते) चार चौघात नवऱ्याचा मुका ? (पुन्हा सगळे हसतात. अजयचे कपडे घालून झाले आहेत)

मधुरा आज तुझा वाढदिवस ना अजू ! मग पाया पडायचं मोठ्या माणसांच्या.

अजय बाग वा ! मी मोठा झालोय आज एका वर्षानं.

मधुरा ताई बोलतो बघ कसा गुलाम.

माई करा कौतुक ! हा विभा याच्या वयाचा होता पण काय बिशाद असा वागेल ! सांगितलेले ऐकायचा निमूटपणे.

विभाकर फक्त एकाच बाबतीत आईचं नाही ऐकलं !

मधुरा कुठल्या बाबतीत ?

विभाकर लग्नाच्या ! आईच्या मनाविरुद्ध लग्न केलं- रजिस्टर ! तिला वैदिक हवं होतं.

अजय मावशी चल ना. शाळेला उशीर होईल.

मधुरा आधी पाया पड सर्वांच्या ! प्रथम आजीच्या. (अजय माईच्या पाय पडतो)

माई औक्षवंत हो. (अजय नंतर विभाकरच्या पाया पडतो. त्यानंतर वासंतीच्या पाया पडतो)

विभाकर वाढदिवसाचा आम्हाला नाही का गोड गोड द्यायचा पापा.

वासंती आणि आम्हाला. (अजय दोघांच्या मधे येऊन उभा रहातो.)

अजय लौकर घेऊन टाका ! शाळेला उशीर होतोय. (विभाकर व वासंती त्याच्या एकेका गालाचा मुका घ्यायला तोंड त्याच्या गालाजवळ नेतात तोच अजय निसटतो. विभाकर व वासंतीची तोंडं एकमेकांना भिडणार तोच ते बाजूला होतात.)

अजय कशी गम्मत केली. (मधुरेला बिलगतो. विभाकर व वासंती नरमतात.)

वासंती — फारच खट्याळ होत चाललाय.

मधुरा — जाऊ दे ग. अजयच्या निमित्ताने का होईना–

वासंती — पुरे पुरे कळलं.

माई — मी देवळात जाऊन येते सूनबाई–अजयलाहि घेऊन जाते.

अजय — मी नाही येणार.

मधुरा — असं बोलायचं नाही. आजीबरोबर देवळात जायचं नि तिथून शाळेत.

अजय — तू चल.

मधुरा — असा हट्ट नाही करायचा. नाहीतर तुमची आमची कट्टी फू.

अजय — आधी सुटली म्हण.

मधुरा — सुटली ! आता जा पाहू.

अजय — मावशी– शाळेतून आणायला तू ये. नाहीतर पुन्हा आजी येतील.

माई — नाही बाबा– आम्ही नाही येणार ! तुझी लाडकी मावशीच येईल हो ! चल (माई अजयला घेऊन जाते)

विभाकर — (वासंतीला) मला वाटतं वासंती तुझ्या बहिणीच्या लग्नात हुंड्याबिंड्याचा खर्च येणार नाही आपल्याला– फक्त अजयला तिच्या बरोबर जावं लागेल सासरी जाताना.

मधुरा — भाओजी कितीदा सांगितलं की माझ्या लग्नाचा विषय काढायचा नाही म्हणून.

विभाकर — (हसून) आम्ही कितीदा सांगितलं की लग्नाचं मनावर घे म्हणून ! अग लग्नाचं वय आणि मंत्र्याची खुर्ची सारखीच ! हातून निसटली की निसटली.

मधुरा — (व्याकुळपणे) भावोजी.

वासंती — वेडे तुझी व्यथा आम्ही जाणत का नाही ! अजाणता एखादी गोष्ट घडली म्हणून जाणून बुजून तिचा पाठपुरावा का करायचा !

विभाकर — यंदा कर्तव्य आहे असं आम्ही नुसतं जाहीर करायचा अवकाश– क्यू लागेल क्यू ! मी जाहीर निवेदनाचा मसुदाही तयार केलाय ! यंदा कर्तव्य आहे. नाव मधुरा, वय–आली पंचाईत ! बायकोचं खरं वय ठाऊक नाही– मेहुणीचं काय कळणार. जाऊ दे. तरुण म्हटलं की वय विचारत नाही मुली–तरुण–देखणी–पहाताच कुणीहि प्रेमात पडावं अशी. वीणकाम–[illegible]–[illegible]—

मधुरा — (एकदम) भावोजी. (विभाकर थांबतो.) [illegible] दोघाना मी जड झाले [illegible] तुमच्या संसारात तर तसं सांगा. मी निघून जाईन दुसरीकडे. पण [illegible] थट्टा नाही सहन करू शकत मी– (आवेगाने आत निघून



जाते.)

वासंती — आता काय म्हणावं हिला ! लग्नाचा आग्रह करून मी तर बाई थकले.

विभाकर — थोडी विश्रांती घे– इन्टरव्हल–आणि पुन्हा आग्रह सुरू कर.

वासंती — सदानकदा कसली थट्टा !

विभाकर — (गंभीर होत) थट्टा केली असलीच तर ती दैवानं केलीय तुझ्या बहिणीच्या बाबतीत.

वासंती — खरंच किती आनंदात होतो आपण मधुरेचा प्रेमविवाह ठरला तेव्हा. किती स्मार्ट बोलघेवडा होता अमरेश ! बंगाली असूनही मराठी काय छान बोलायचा ! त्याच्या वडिलाना तर आमची मधुरा फार आवडली होती. म्हणायचे नक्की काहीतरी गफलत झाली असणार– असे सुंदर डोळे फक्त बंगालीच बाईचे असू शकतात.

विभाकर — पण या सुरेख डोळ्याना दृष्ट लागली कुणाची ! फक्त अश्रूच वाट्याला आले त्यांच्या ! वासंती हे पहिलं प्रेम मोठं नाजूक असतं रेशमी कोशासारखं ! एखादा धागा तुटला की सारा कोश गळून पडतो. तिची जखम मी जाणतो, त्याच्या वेदनाही जाणतो. पण या स्वप्नातून तिला बाहेर पडायला हवं. कुणीतरी यायला हवं तिच्या या रित्या जीवनात ते हरवलेले सूर घेऊन.

(पोस्टमन असा आवाज येतो व एक पत्र दाराच्या फटीतून आत येते. विभाकर पत्र उचलतो. फोडतो. वाचतो)

वासंती — कुणाचं पत्र ?

विभाकर — अभिजीतचं ! माझ्या बालमित्राचं.

वासंती — ज्याच्या गमती तुम्ही सांगत असता तो !

विभाकर — होय तोच तो ! आज येतोय तो. तू त्याला बघितलं नाहीस नि त्यानेही तुला पाहिलं नाही ! आपल्या लग्नाच्या वेळी तो होता फॉरेनला.

वासंती — करतात काय हे तुमचे अभिजीत !

विभाकर — काय करीत नाही ते विचार– चित्रपटाचा हीरो बनायचा म्हणून कॉलेज सोडलं– नंतर ती लाईन सोडली नि मेडिकल सेल्समन झाला. तिथंहि रमला नाही. कुठल्यातरी उद्योगपतीचा पी. ए. झाला. त्याच्याबरोबर फॉरेनला गेला ! आता काय करतोय कुणास ठाऊक ! राज्यपालसुध्दा झाला असेल कुठल्या तरी प्रांताचा (टेलिफोनकडे जातो. नंबर फिरवू लागतो. वैतागाने रिसीव्हर ठेवतो.) हूं ! टेलिफोन आणि बायको सारखीच. जेव्हा केव्हा काही महत्वाचं हितगूज करावसं वाटतं तेव्हां मूड बिघडलेला. (बाहेर जाऊ लागतो)

वासंती — बाहेर कुठे निघालात !

विभाकर — समोरच्या बंगल्यातून करून येतो फोन.

वासंती — साधाच फोन ना की महत्वाचं हितगुज ! (विभाकर काही न बोलता हसत हसत बाहेर निघून जातो. वासंती आत जायला वळते तोच आतून मधुरा बाहेर येते)

वासंती — आज क्लास नाही संगीताचा !

मधुरा — आहे– पण आज जाणार नाही मी– फोन करून कळवते तसं.

वासंती — अग फोन बिघडलाय ! हेच समोरच्या बंगल्यावर गेलेयत फोन करायला. (तोच दारावरली बेल वाजते) बघ बाई कोण आलंय ते. (आत निघून जाते. मधुरा जाऊन दार उघडते. दारात अभिजीत उभा आहे. एक अठ्ठावीस तीस वर्षांचा स्मार्ट– हसतमुख तरुण हातात छोटी अ‍ॅटची आहे)

अभिजीत — मे आय कम इन.

मधुरा — यस. (तो आत येतो)

अभिजीत — माझं नाव अभिजीत ! विभाकरनं सांगितलं असेलच मी येणार म्हणून.

मधुरा — नाही.

अभिजीत — नाही ! मुळापासून धांदरट आणि विसरभोळा लेकाचा ! मी आणि तो लहानपणापासून एकत्र वाढलो—खेळलो. तुमच्या लग्नाची पत्रिका मिळाली मला—पण मी लंडनला. (मधुरा चमकते.) लंडनहून येणं शक्य नव्हतं. पण अभिनंदनाची केबल पाठवली होती. पण ती तुमच्या कुठली लक्षात असायला ! तुम्ही दोघं मूडमध्ये असणार त्यावेळी मधुचंद्राच्या.

मधुरा — मधुचंद्राच्या !

अभिजीत — यस. हनीमून ! आम्ही नुसतं त्याबद्दल ऐकतो आहोत इतके दिवस– मोठी गम्मत असेल नाही मधुचंद्र म्हणजे.

मधुरा — अहो पण—

अभिजीत — तुम्ही नका सांगू– विभाकर सांगेल. पण त्या मधुचंद्राची फलप्राप्ती वगैरे ! म्हणजे मूलबाळ–

मधुरा — मूलबाळ !

अभिजीत — यस ! दो या तीन बस्स ! बाकी विभाकर इज डॅम लकी वैनी.

मधुरा — वैनी ! तुमचा काहीतरी गैरसमज होतोय.

अभिजीत — पुष्कळ लोकांचा माझ्याबद्दल होतो या बडबड्या स्वभावामुळे ! म्हणून लग्नही केलं नाही मी. म्हणजे जिच्याशी लग्न करावं असं वाटायला लावणारी मुलगीच भेटली नाही मला ! आज तुम्हाला पाहिलं आणि लग्न करावसं वाटू लागलं !

मधुरा — (दचकून) काय ?



अभिजीत — तुम्हाला एखादी धाकटी बहीण आहे का हो ! अगदी तुमच्यासारखी दिसणारी– अशाच बंगाली डोळ्यांची– (मधुरा दचकते) बंगाली डोळे हा माझा वीक पॉईंट ! मागे मी कलकत्याला गेलो होतो एका बंगाली मित्राच्या घरी ! त्याच्या घरी एक मुलगी पाहिली. शामोली नाव तिचं ! तुमची कार्बन कॉपी ! पण हाय गे उज्जयनी ! ती अ‍ॅंगेज्ड होती ! जाऊ दे. पण हा विभा गेलाय कुठे ?

मधुरा — समोरच्या बंगल्यात टेलिफोन करायला.

अभिजीत — म्हणजे लौकरच येईल ! पण वैनी ते बहिणीचं विसरायचं नाही.

मधुरा — कोण वैनी ?

अभिजीत — तुम्ही ! तुम्हाला प्रथम पहातोय म्हणून काही ओळखता येत नाही मला ?

मधुरा — मी विभाकरांची पत्नी नाही ! मी त्यांची मेहुणी.

अभिजीत — मेहुणी ? म्हणजे विभाच्या बायकोची बहिण !! बापरे मेलो– ठार झालो. (आतून वासंती येते,)

वासंती — कुणाशी बोलतेयस इतका वेळ ?

अभिजीत — माझ्याशी ! मी अभिजीत ! पण तुम्ही तरी नक्की विभाच्या पत्नी ना ?

वासंती — म्हणजे ?

अभिजीत — अहो मी यानाच विभाची बायको समजून बोलत होतो. आणि चक्क यानाच मागणी घातली. (वासंती आश्चर्याने पहाते) नाही कळलं ? अहो मी यानाच विचारलं की तुमची एकादी धाकटी बहीण लग्नाची आहे का ? आपण लग्नाला तयार आहोत–

वासंती — मग त्यात वाईट काय झालं ? (मधुरा रागाने वासंतीकडे पहाते व आत निघून जाते)

अभिजीत — रागावल्या वाटते ? छे: छे: आयुष्यात अशी विकेट कधी गेली नव्हती माझी.

वासंती — हे बोलले होते मला तुम्ही आज येणार म्हणून.

अभिजीत — मग या पाहुण्याच्या आगमनानिमित्त काही खास डिशीश !

वासंती — केली आहे तर! आज वाढदिवस आमच्या अजयचा–

अभिजीत — वंडरफूल ! कुठे आहे आमचा पुतण्या !

वासंती — शाळेत गेलाय ! तुम्ही बसा. हे समोरच गेलेयत फोन करायला. येतील आता. (आत जाऊ लागते)

अभिजीत — वैनी– तुमची बहीण खरंच रागावली नाही ना माझ्यावर !

वासंती — मी विचारते तिला आत गेल्यावर का तिलाच बाहेर पाठवू ! तुम्हीच विचारा.

अभिजीत — नको नको– जाताना असे डोळे वटारून गेलीय जणू दोनदोनशे कॅंडल

पाँवरचे बल्बच. (तोच दारावरली बेल वाजते– वासंती जाऊन दार उघडते. बिभाकर आत येतो.)

वासंती   पाहलंय का कोण आलंय ते !

विभाकर   (पाहून) अभि....

अभिजीत   या– घर आपलंच आहे. (दोघे एकमेकाना बिलगतात) किती दिवसानी भेटतोय आपण !

विभाकर   दिवसानी ! वर्षांनी म्हण. अरे हो– तुझी ओळख करून द्यायला विसरलो– ही माझी...

अभिजीत   आम्ही ओळख आधीच करून घेतलीय.

वासंती   यानी तर कमालच केली. आल्याबरोबर सरळ मागणी घातली मधुरेला—

अभिजीत   त्यांचं काय झालं. मी त्यांना तुझी बायको समजलो [illegible] सारखी दिसणारी त्यांची धाकटी बहीण लग्नाची आहे का म्हणून.

विभाकर   (हसत) गुड जोक ! वासंती हा प्रथमच आलाय घरी. त्याला चहा वगैरे काही देशील की नाही.

वासंती   देते ना (हसतहसत आत जाते)

विभाकर   बैस रे ! (तो बसतो.) काय करतोस हल्ली !

अभिजीत   उन्नतनगर सहकारी साखर कारखान्याच्या डायरेक्टर बोर्डावर आहे मी !

विभाकर   तुझा या धंद्याशी काय संबंध !

अभिजीत   ते त्या लोकाना विचार ! तसं पाहिलं तर माझा नि साखरेचा मधुमेहापुरता- सुद्धा संबंध नाही. पण ज्या गोष्टींचं मला ज्ञान नसतं नेमकी तीच गोष्ट मला येऊन चिकटते.

विभाकर   साखरेचं खाणार त्याला देव देणार.

अभिजीत   साखरेविषयी बोलून बोलून तोंडाला मुंग्या आल्या आहेत. इथे तरी त्या साखरेचं नाव काढू नकोस नि भावही विचारू नकोस कारण मला तो ठाऊक नाही.

विभाकर   छान ! म्हणजे तू आमच्या मंत्रीमंडळात घेण्याच्या लायकीचा झालास ! तिथंही ज्याला जे येत नाही त्याला ते खातं देण्यात येतं. (दोघेहि हसतात) पण तू उतरलास कुठे ?

अभिजीत   गव्हर्मेंट रेस्ट हाऊस !

विभाकर   का आमचं घर नव्हतं ?

अभिजीत   होतं ! पण माझ्याकडे काहीना काही काम घेऊन इतकी माणसं येत असतात की वैतागून तू आणि वैनी एखाद्या हॉटेलात रहायला गेला असतात ! बरं पण मला सांग. तुझं कसं चाललंय !

विभाकर   छान चाललंय ! एकच वैताग आहे. दर तीन वर्षांनी एक वर्ष फिरतीवर जावं लागतं दुसऱ्या गावी.

अभिजीत   चला. तेवढीच वैनींना सुटी (हसतो) ए विभा आपण लहानपणी काय काय स्वप्न रंगवली होती रे.

विभाकर   हो ना ! मी फास्ट बोलर होणार होतो. पण नशिबी आलं रोज फास्ट लोकलची वाट पहाणं.

अभिजीत   आणि मी सैगलसारखा गाणारा नट होणार होतो.

विभाकर   फार गोड आवाज होता तुझा.

अभिजीत   म्हणूनच शेवटी साखर कारखाना नशिबी आला. एक बंगला बने न्यारा.

विभाकर   तुझ्या या गाण्यावर सगळे विद्यार्थी विद्यार्थीनी लुब्ध असायचे. प्रत्येक गॅदरिंगला तुला हे फर्मायशी गाणे गायला लावायचो आम्ही.

अभिजीत   तो स्वप्नातला बंगला स्वप्नातच राहिला. नशिबी आलं रेस्टहाऊसमधलं एकाकी जिणं !

विभाकर   एक विचारू तुला अभि!

अभिजीत   विचार ना.

विभाकर   माझी मेहुणी खरंच आवडली तुला ?

अभिजीत   तशी मला एलीझाबेथ टेलर पूर्वी आवडली होती ! पण तिला रिचर्ड बर्टन आवडला.

विभाकर   नाही पण तू लग्नाबद्दल सिरियस असशील तर मी शब्द टाकतो.

अभिजीत   जरूर टाक. बेस्ट ऑफ लक. (दोघेहि हसतात. विभाकर उठतो.)

विभाकर   तू बैस. मी कपडे बदलून येतो. ऑफिसची वेळ होत आली बी कंफरटेबल (आत निघून जातो)

(अभिजीत गाणं गुणगुणू लागतो. 'एक बंगला बने न्यारा' तोच पाठीमागून मधुरा येते चहाचा कप घेऊन–ती कप पुढे करते. मागे न पहाता अभिजीत तो घेतो)

अभिजीत   तुम्ही उगाच त्रास घेतलात वैनी– (चहाचा कप तोंडाला लावतो) तुमच्या बहिणीला नक्की राग आला असणार ! पण मी तरी काय करणार ? इष्कपर जोर नही. आता तुमचा नवरा माझ्याबाबतीत तिच्याकडे शब्द टाकणार आहे. तिने नाही म्हटलं तर मी उडी टाकणार आहे मलबारहिलवरून खाली. फॉरेनमध्ये इतक्या मुली पाहिल्या पण काळजाची हल्ली जरासुद्धा बिघडली नाही. पण तुमच्या बहिणीला पाहलं. बस्स ! दिल दिया और दर्द लिया. ( छातीला हात लावतो )

मधुरा   व्हीक्स वेपोरब देऊ का छातीला चोळायला ?